RP-249-20

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १० वे अंक - ४ था जानेवारी ते मार्च - २०२०

भाग - १

UGC CARE Listed Journal
ISSN 2231-573X

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

❖ संपादक ❖

डॉ. शिवाजी हुसे
मराठी विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद.

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

Scanned with OKEN Scanner

१० वे - अंक - चौथा - जानेवारी ते मार्च - २०२०
ISSN 2231 - 573X

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

# २. मध्ययुगीन मराठी साहित्याचे अध्ययन-अध्यापन :एक दृष्टीक्षेप

डॉ. राजाराम अं. झोडगे
नूतन महाविद्यालय,सेलू जि. परभणी.

मराठी वाङ्मयेतिहासात मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा कालखंड महत्वपूर्ण मानला जातो. साधारणपणे इ.स.१३५० ते १८०० हा ४५० वर्षांचा कालखंड मध्ययुगीन मराठी साहित्याचा मानला जातो. या काळातील बहुतांश साहित्य हे पंथीय, अध्यात्मिक असल्याचे दिसते. महाराष्ट्रात संतपरंपेत निर्माण झालेले अभंग, भारूड, ओवी, आख्यान, चरित्र प्रकारांतून ते फुलले. अध्यात्म, इश्वरभक्ती, पुराणकथा, संतचरित्रे यांवर मध्ययुगीन साहित्य आधारलेले आहे.वारकरी, महानुभाव, दत्त, सुफी, नाथ अशा सांप्रदायिक साहित्यातून त्या त्या सांप्रदायाच्या विचार, तत्वांचे प्रकटीकरण, प्रचार असल्याने व ते पारलौकिक विचार करणारे असल्याने ते समाजाभिमुख नाही असे आक्षेप या साहित्यावर घेतले जातात. परंतु हे साहित्य आध्यात्मिक असले तरी काही अपवाद वगळता तत्कालीन अनेक संतांच्या साहित्यातून त्या काळातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनाचे संदर्भ आलेले दिसतात.

या साहित्यातून तत्कालीन विषमता, वर्णव्यवस्थेचे समर्थन केलेले दिसते असाही आक्षेप आहे त्यात तथ्य असले तरी संत तुकारामांसारख्या पुरोगामी, विज्ञानिष्ठ संतांच्या साहित्याकडेही आपणाला दुर्लक्ष करता येणार नाही. शिवाय या कालखंडातील सौंदर्यानुभव, मूल्य, तत्वप्रतिपादन ही साहित्याची वैशिष्ट्ये अव्हेरून चालणार नाहीत. त्यामुळे मध्ययुगीन साहित्याचे भाषिक, सामाजिक, सांस्कृतिकदृष्ट्या महत्व अधोरेखित होते. म्हणूनच मराठी भाषा, साहित्याभ्यासकांसाठी मध्ययुगीन मराठी साहित्य हा अध्ययन, अध्यापन व संशोधनासाठी महत्वाचा विषय आहे.

विद्यापीठीय अभ्यासक्रमांत मध्ययुगीन मराठी वाङ्मय ही अभ्यासपत्रिका समाविष्ठ आहे. साहित्याचा, भाषेचा अभ्यास करणाऱ्या प्रत्येकाला त्या भाषेतील प्राचीन साहित्य, संस्कृतीची जाण असल्याशिवाय पुढे जाता येत नाही. त्यामुळे काही उद्दिष्ट्ये डोळ्यांसमोर ठेऊन अनेक विद्यापीठांतून हा विषय अभ्यासला जातो. नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात कला तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास ही अभ्यासपत्रिका अभ्यासासाठी ठेवतांना काही उद्दिष्टे निश्चित केली आहेत त्यात मध्ययुगीन मराठी साहित्य निर्मितीमागील प्रेरणा समजून घेणे, या साहित्याचे स्वरूप, परंपरा व इतिहास यांचा परिचय करून देणे, मध्ययुगीन कालखंडातील वाङ्मयाच्या सामाजिक तथा सांस्कृतिक पार्श्वभूमी अभ्यासणे, या काळातील विविध संप्रदायांच्या विचारधारा समजूण घेणे, या कालखंडातील वाङ्मयाबद्दलची अभिरूची वाढवणे इ. अशी उद्दिष्टे समोर ठेवून अध्ययन व अध्यापन झाल्यास निश्चितच विद्यार्थ्यांमध्ये आपल्या वाङ्मयीन परंपरेचे भान व जाण अवगत होऊन त्यांच्या सखोल अभ्यास व सर्जनशीलतेला चालना मिळू शकते.



PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

Scanned with OKEN Scanner

मध्ययुगीन साहित्याच्या अध्ययन-अध्यापनातून या कालखंडातील साहित्य, त्यातून प्रकट झालेली मानवी मूल्ये, विचार यांचे आकलन होते. या कालखंडातील विविध भक्तीसंप्रदाय, त्या संप्रदायाची विचारधारा, जीवनविषयक दृष्टिकोन इ.ची ओळख होते.

मध्ययुगीन कालखंडातील साहित्याच्या अभ्यासातून तत्कालीन वाङ्मयीन रचनाप्रकार, वाङ्मयीन, सामाजिक चळवळींची पार्श्वभूमी, प्रेरणा इ.ची ओळख होते. भाषिक अभ्यासाच्या अनुषंगानेही मध्ययुगीन साहित्याभ्यास महत्वाचा ठरतो.

मध्ययुगीन साहित्याच्या अध्ययन-अध्यापनाची उद्दिष्टे, आवश्यकता यांबरोबरच या संदर्भातील अडचणींचाही विचार करणे क्रमप्राप्त ठरते. मध्ययुगीन साहित्य हे अध्यात्मिक, धार्मिक, पंथीय असल्याने तसेच त्यातील पाप-पुण्य, स्वर्ग - नर्क, मोक्ष अशा अलौकिक,रूढीप्रिय बाबींमुळे ते अभ्यासावे का ? हाच प्रश्न मुळात अनेकदा उपस्थित केला जातो. याबाबत अनेक मतमतांतरे अभ्यासकांत आहेत. आज भाषिक वा साहित्यिक अभ्यासाकडे जीवनवादी, उपयोजित दृष्टिकोनातून पाहिले जात आहे. अशवेळी अलौकिक, मरणोत्तर जीवनविचार मांडणाऱ्या साहित्याविषयी काहीसा नकारात्मक सूर निर्माण होण्याची शक्यता असते.

मध्ययुगीन वाङ्मय समजून घेतांना येणारी आणखी एक अडचण म्हणजे या साहित्यातील तत्कालीन भाषा, अपरिचित लिपी, शब्दार्थ, सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी अभ्यासकाला गोंधळून टाकण्याची शक्यता असते.

आज समाजमाध्यमांच्या व चंगळवादी दुनियेतील तरूण पिढीला, विद्यार्थ्यांना इतिहासामध्ये, पारंपारिकता, संस्कृतीमध्ये फारसा रस दिसत नाही. आज-आत्ता काय हे पाहणारी Instant तरूण पिढी वर्तमानात किंवा स्वप्नात रमते. च्समकालीन वाङ्मयापेक्षा प्राचीन मराठी वाङ्मयाशी विद्यार्थ्यांचा संबंध फार कमी असतो. ज्या सामाजिक, सांस्कृतिक व तत्वज्ञानात्मक संदर्भात या वाङ्मयाचा अभ्यास करावा लागतो ते संदर्भ तर त्यांना जवळ-जवळ पूर्णपणे अपरिचित असतात असे आता आढळून येऊ लागले आहे. मध्ययुगीन महाराष्ट्रीय जीवनाच्या सांस्कृतिक, तत्वज्ञानात्मक अंगाशी तत्कालीन वाङ्मयाचा जैव संबंध गृहित धरला तरी तो सिध्द करण्यासाठी किंवा त्या संदर्भात तुलना व चिकित्सा करण्यासाठी आवश्यक तेवढीही प्राचीन सांस्कृतिक, तत्वज्ञानात्मक पंरपरांची जाण अलीकडे कोणामध्येही फारशी राहिलेली नाही असे आपल्या दृष्टोत्पतीस येऊ लागले आहे.छ[१] त्यामुळे मध्ययुगीन साहित्याच्या, पार्श्वभूमीच्या अध्ययन-अध्यापनामध्ये अडचणी निर्माण होतात.

मध्ययुगीन मराठी साहित्यातील वादस्थळे हीसुध्दा या साहित्याच्या अध्ययन-अध्यापनासंदर्भात एक अडथळा ठरतात. मध्ययुगीन साहित्यकृती, त्यांचा निर्मितीकाल, लेखक कवींचे जन्मस्थळ, काळ, संहितांचे शुध्द-अशुध्द पाठभेद यासंदर्भातले प्रश्न साहित्यविश्वात नेहमीच चर्चेत असतात. संतचरित्रातील चमत्कारिक घटना प्रसंग, आद्यकवी मुकूंदराज अंबाजोगाईचे की अन्य ठिकाणचे, नामदेव व विष्णुदासनामा यांच्या अभंगांची कर्तृत्वनिश्चिती असे प्रश्न विद्यार्थ्यांचा,अभ्यासकांचा गोंधळ वाढवतात.

मध्ययुगीन साहित्यातील विविध संप्रदाय, त्यांतील अनेक लेखक-कवी, त्यांच्या असंख्य रचना, त्यांची नांवे, लेखनकाळ, इ.स., आशय इ.बाबींचे स्मरण-आकलन विद्यार्थ्यांबरोबरच अध्यापकालाही पुरेसे असतेच असे नाही त्यामुळे हा

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

विषय अवघड वाटू लागतो. शिवाय मध्ययुगीन वाङ्मयाची विशाल व्याप्ती व त्यांचे अभ्यास घटकांच्या अध्ययन-अध्यापनासाठी मिळणारा कालावधी यांचाही मेळ न बसल्यामुळे या साहित्याचा धावता आढावा असेच या साहित्याभ्यासाचे स्वरूप बनते.

कुठल्याही कालखंडात निर्माण झालेले साहित्य हे त्या त्या काळाचा, परिस्थितीचा, विचारांचा परिपाक असते. ते सर्वकालीन परिपूर्णतेच्या कसोटीवर उतरेलच असे नाही. त्यामुळे काळाच्या मर्यादा स्विकारून अशा साहित्याचा, त्याच्या परंपरा, विचार, तत्वज्ञानाचा डोळस अभ्यास महत्वाचा ठरतो. आज मध्ययुगीन मराठी साहित्याच्या अभ्यासाचा प्रवाह काहीसा क्षीण, मंदावला असल्याचे दिसते.

मध्ययुगीन कालखंडातील वारकरी संप्रदायातील संत साहित्याचा अभ्यास, संशोधन मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्या खालोखाल महानुभाव संप्रदायाचाही अभ्यास दिसतो परंतु दत्त संप्रदाय, समर्थ, सूफी, वीरशैव, नागेश, नाथ अशा संप्रदायांचा, पंडिती, बखर, शाहिरी वाड्मयाच्या अभ्यास-संशोधनाचे प्रयत्न तुलनेने अल्प दिसतात. तसेच तुलनात्मक दृष्टीकोनातून या साहित्याच्या अभ्यासाचे क्षेत्रही अभ्यासकांसाठी महत्वाचा विषय ठरते. मध्ययुगीन साहित्यातील कालबाह्य, काळाच्या, विज्ञानाच्या कसोटीवर न टिकणाऱ्या बाबींना अव्हेरून त्यातील जीवनमूल्ये, नैतिक विचार, सामाजिकता याचा नव्याने अभ्यास-संशोधन करणे मराठी भाषा-साहित्य तसेच इतिहास अभ्यासकांसाठी महत्वाचे ठरते.

संदर्भ

१. कुलकर्णी गो.ग.,प्राचीन मराठी वाङमयाचे अध्ययन व अध्यापन, साहित्यः अध्यापन आणि प्रकार, संपा.श्री.पु.भागवत व इतर, पॉप्युलर आणि मौज प्रकाशन, मुंबई. १९८७ पृ.६२

२. जोशी, डॉ.वसंत स. व डॉ.गं.ना, जोगळेकर, भाषा व साहित्य संशोधन, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे जून, १९८५

३. आमची श्रीवाणी, ऑक्टो.२०१८ ते जाने.२०१९ व फेब्रु. ते मे २०१९

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner